**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक २७ सप्टेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **4G मोबाईल सेवेसाठी राज्यात ९ हजार २० टॉवर उभारण्यात येणार. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते स्वदेशी तंत्रज्ञानाच्या ९७ हजार ५०० पेक्षा जास्त मोबाईल 4G टॉवर्सचं उद्घाटन.**
2. **वन्यप्राण्यांची शांतता भंग न करता जंगलांचा अधिक भाग पर्यटकांसाठी खुला केला तर स्थानिक आदिवासींच्या विकासाला चालना मिळेल -केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं प्रतिपादन.**
3. **येत्या 14 ऑक्टोबर रोजी महाविहार मुक्ती आंदोलनाचा भाग म्हणून सर्वपक्षीय विराट मोर्चाचे आयोजन करण्यात येणार.**

**आणि**

4. **संघाच्या शताब्दी सोहळ्यानिमित्त नागपूरमध्ये पहिल्यांदाच तीन भागांमधून पथसंचालन, सरसंघचालक करणार निरिक्षण.**

---

स्वदेशी 4G

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज दूरसंचार क्षेत्रात स्वदेशी तंत्रज्ञानाच्या आणि सुमारे ३७ हजार कोटी रुपये खर्चाच्या ९७ हजार ५०० पेक्षा जास्त मोबाईल 4G टॉवर्सचं उद्घाटन दूरस्थ पद्धतीनं केलं. या कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण पुण्यात करण्यात आलं, यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. 4Gच्या माध्यमातून गावागावांपर्यंत संपर्काव्यवस्था उभी राहत आहे, यद्वारे नागरिकांना आवश्यक सेवा येत्या दोन महिन्यात सुरू करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. देशभरात ९२ हजारपेक्षा जास्त टॉवर उभारण्यात येणार असून त्यातले ९ हजार २० टॉवर महाराष्ट्रात आहेत, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. या क्षेत्रात भारतानं आपलं सामर्थ्य दाखवून दिल्याचं ते म्हणाले...

***(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस)***

***शुद्ध शंभर टक्के देशी तंत्रज्ञानावर आधारित आम्ही या टॉवरच्या माध्यमातनं 4G ची निर्मिती केली आणि जगातला पाचवा देश हा भारत बनला. एक लक्षात ठेवा***

***भारताला ज्या ज्या वेळी कोणी चॅलेंज केलं आहे, त्या-त्या वेळी भारताने उत्तर दिलेलं आहे. आपली क्षमता दाखवून दिलेली आहे.***

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज ओदिशाच्या दौऱ्यावर आहेत. झारसुगुडा इथं आयोजित कार्यक्रमात साठ हजार कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी पंतप्रधानांनी केली.  दूरसंचार, रेल्वे, उच्च शिक्षण, आरोग्यसेवा, कौशल्य विकास, ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्र अशा विविध क्षेत्रांतल्या प्रकल्पांचा त्यात समावेश  आहे. गरीबांना हक्काचं पक्कं घर मिळवून देण्यासाठी केंद्रसरकार वचनबद्ध असल्याचं त्यांनी यावेळी भाषणात सांगितलं. दूरसंचार क्षेत्रात, स्वदेशी तंत्रज्ञानाच्या आणि सुमारे ३७ हजार कोटी रुपये खर्चाच्या ९७ हजार ५०० पेक्षा जास्त मोबाईल 4G टॉवर्सचं उद्घाटन त्यांनी केलं. या क्षेत्रातल्या भारताच्या प्रगतीबद्दल ते म्हणाले....

***(होल्ड बाईट- पंतप्रधान नरेंद्र मोदी)***

***हमारे लिए गौरव की बात है कि हमारे बीएसएनएल ने अपने ही देश में पूरी तरह स्वदेशी 4G टेक्नोलॉजी विकसित कर ली है अपनी मेहनत, अपनी लगन, अपनी कुशलता से बीएसएनएल ने नया इतिहास रच दिया है और मैं इस काम में जुड़े हुए देश के नौजवानों को उनके टैलेंट को और भारत को आत्मनिर्भर बनाने के लिए उन्होंने जो बड़ा काम किया है, मैं उन सभी नौजवानों को बहोत -बहोत बधाई देता हूं)***

या प्रकल्पांमुळे ओदिशा आणि शेजारी राज्यांमध्ये मालवाहतूक आणि प्रवासी वाहतुकीत मोठ्या प्रमाणावर सुधारणा होऊन स्थानिक उद्योग आणि व्यापाराला बळकटी मिळेल.

**---------------------------------------------**

मन की बात

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीच्या मन की बात कार्यक्रमातून देशोदेशीच्या श्रोत्यांना संबोधित करतील हा या कार्यक्रमाचा १२६ वा भाग असेल.

सेवापर्व- दुर्मिळ मूर्ती आणि पुरातन वस्तू

सेवा आणि सुशासन या सूत्राच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार परिवर्तन आणि प्रगती घडवून आणण्यासाठी निरंतर प्रयत्नरत आहे. सेवापर्व निमित्त विशेष मालिकेच्या आजच्या भागात, सरकारने देशभरातून चोरीला गेलेल्या दुर्मिळ मूर्ती आणि पुरातन वस्तू, जगभरातून परत आणत, पुनरुज्जीवीत केलेल्या सांस्कृतिक अभिमानाविषयी, जाणून घेऊया.

*(होल्ड बाईट)*

*(वॉइस बाईट - हेमांगी कुलकर्णी)*

*“पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारचा सांस्कृतिक प्रवास चैतन्यदायी, परंपरेची मुळं जपणारा तसंच जगासाठी देशाची दारं खुला करणारा आहे. देशातून चोरीला गेलेल्या मूर्ती आणि पवित्र अवशेष परत आणण्यापासून ते दीर्घकाळापासून हरवलेल्या मौल्यवान पुरातन वस्तू परत आणण्यापर्यंत सांस्कृतिक पुनरुज्जीवनाची ही कहाणी.*

*(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी 26 सेकंद)*

*आज का भारत अपने इतिहास पर गर्व करता है बीते एक दशक में हमनें देश की धरोहरो के संरक्षण पर मिशन मोड में काम किया है देश की एनसीअन्ट स्टेच्यू ( ancient statues) और आर्टिफैक्ट्स जिन्हें चुराकर विदेशों में बेच दिया गया था उन्हें वापस लाया गया है।*

*(देशभरातून चोरीला गेलेल्या वस्तूंपैकी २०१४ पासून आतपर्यंत ६४२ पुरातन वस्तू सापडले आहेत. आणि त्या परत आणण्याच्या विविध टप्प्यांवर आहेत, त्या २०१३ पूर्वी फक्त १३ होत्या. यावर्षी परत मिळवलेल्या सर्वात प्रसिद्ध वस्तूंपैकी एक म्हणजे भगवान बुद्धांचे पिप्रहवा अवशेष. इतर पुरातन वस्तू ज्या परत मिळाल्या आहेत त्यात युकेमधील ब्रह्मा आणि ब्राह्मणीचे दगडी शिल्प, अमेरिकेतील दुर्गेची दगडी प्रतिमा, अमेरिकेतील नृत्याच्या स्थितीत नटराजाची प्रतिमा यांचा समावेश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या परदेश दौऱ्यांदरम्यान अशा काही वस्तू त्यांना परत करण्यात आल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटल्याप्रमाणे, वारसा हा केवळ इतिहास नव्हे, तर तो मानवतेची सामायिक जाण आहे.”)*

---

नितीन गडकरी

वन्यप्राण्यांची शान्तता भंग न करता जंगलांचा अधिक भाग पर्यटकांसाठी खुला केला तर स्थानिक आदिवासींच्या विकासाला अधिक चालना मिळेल असं मत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केलं आहे. नवी दिल्ली इथं आयोजित वन्यजीवनाबद्दलच्या छायाचित्र प्रदर्शनाचं उदघाटन करताना ते आज बोलत होते. सध्या देशातल्या जंगलांमधला फक्त २० टक्के भागच पर्यटकांसाठी खुला असून ८० टक्के भागात पर्यटकांना प्रवेश नसल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

---

महाबोधी विहार

भारतातील तसेच जगातील बौद्ध धर्मियांनी बोध गया मंदिर कायदा 1949 रद्द करून महाबोधी महाविहार मुक्त करावे अशी मागणी शांततेने आणि जनआंदोलने करून केली आहे देशभरात विविध आंदोलन संमेलन परिषदा होऊन राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय अल्पसंख्यांक मंत्री आणि बिहार सरकारला निवेदने पाठवली जात आहे परंतु याबाबत कुठलाही ठोस निर्णय अजूनही घेतल्या गेल्या नाही या पार्श्वभूमीवर बोधगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनास यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व  बौद्ध बांधव ,सामाजिक, राजकीय ,धार्मिक आणि सांस्कृतिक संघटनांनी एकत्रितरित्या आंदोलन करण्याचे सुनिश्चित केले असून यत्या 14 ऑक्टोबर रोजी महाविहार मुक्ती आंदोलनाचा भाग म्हणून  सर्वपक्षीय विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आज मुंबई इथं बोधगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन कृती समितीच्या पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी सर्वपक्षीय रिपब्लिकन नेते उपस्थित होते.

---------------------------------------------

संघ प्रार्थना

शब्द अर्थ भाव आणि सुर यांचा सुरेख संगम राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संघ प्रार्थनेच्या ध्वनीचित्र फितीत दिसून येतो. याचा जितका प्रचार प्रसार होईल तितके लोक संघाकडे आकर्षित होतील असं प्रतिपादनात सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांनी नागपूर मध्ये केलं

***(होल्ड बाईट - सरसंघचालक डॉ.मोहन भागवत 18 सेकंद)***

***शब्द, अर्थ आणि भाव या तिन्हीला अनुरूप संगीत हे योग जोडून फार कमी वेळा येतात. मुख्य गोष्ट आहे  कि शब्द, अर्थ, भाव आणि सुर यांचं एक समन्वयाचा असं रसायन झालेला आहे. त्यामुळे निश्चित याचा जितका प्रचार प्रसार होईल तितके  नवीन लोक संघाकडे आकर्षित होतील.***

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संघ प्रार्थना ध्वनी चित्रफित लोकार्पण सोहळ्याप्रसंगी भागवत हे नागपूरच्या रेशीम बाग स्थित डॉ.हेडगेवार स्मृती मंदिरात व्यास सभागृह इथे आयोजित कार्यक्रमाला संबोधित करताना बोलत होते. संघ प्रार्थना गायक शंकर महादेवन यांच्या आवाजात स्वरबद्ध केली गेली आहे. दरम्यान संघाच्या शताब्दी सोहळ्यानिमित्त नागपूरमध्ये आज 27 सप्टेंबर शनिवार रोजी पहिल्यांदाच सीताबर्डी, धंतोली यशवंत स्टेडियम आणि अमरावती रोडवरील हॉकी मैदान या तीन भागांमधून पथसंचालन केलं जाईल. या पथसंचालनाचा समारोप आज सायंकाळी पावणे आठ

वाजतासिताबर्डी येथील व्हरायटी चौकात होईल. ज्याचं अवलोकन सरसंघचालक डॉ.मोहन भागवत करतील.

---------------------------------------------

कमलताई गवई

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ५ ऑक्टोबरला अमरावती इथं होणा-या विजयादशमी सोहळ्यास सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या आई कमलताई गवई मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार असल्या वृत्त हिंदुस्थान समाचार संस्थेने दिल आहे.

---------------------------------------------

संघगीत

काही निवडक संघगीत ख्यातनाम गायक-संगीतकार शंकर महादेवन यांनी नव्याने संगीतबद्ध केली असून ती त्यांनी गायिली देखील आहेत. या संघगीत संग्रहाचे लोकार्पण उद्या 28 सप्टेंबर रोजी सायंकाळी 6 वाजता कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग, नागपूर येथे आयोजित करण्यात आले आहे. खासदार सांस्कृतिक महोत्सव समिती, नागपूर द्वारे आयोजित या विशेष सोहळ्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांच्या हस्ते या संघगीत संग्रहाचे लोकार्पण होणार आहे.

---------------------------------------------